# मराठी / MARATHI

## ( अनिवार्य ) / ( Compulsory )

| | |
|---|---|
| *वेळ : **तीन** तास* | *कमाल अंक : **300*** |
| *Time Allowed : **Three** Hours* | *Maximum Marks : **300*** |

---

**प्रश्नपत्रिकेशी संबंधित सूचना**

***प्रश्न सोडविण्यापूर्वी पुढीलपैकी प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचा :***

*सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.*

*प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दिलेले आहेत.*

*प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** (देवनागरी लिपीमध्ये) लिहावयाची आहेत.*

*जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा खूप जास्त अथवा खूप कमी शब्दांत उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जाऊ शकतात.*

*प्रश्न–सह–उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.*

**Question Paper Specific Instructions**

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*All questions are to be attempted.*

*The number of marks carried by a question is indicated against it.*

*Answers must be written in **MARATHI** (Devanagari script) unless otherwise directed in the question.*

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.*

*Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.*

---

**Q1. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर 600 शब्दांत निबंध लिहा :** ***100***

(a) उपभोक्तावादी जीवनशैली आणि पर्यावरण

(b) मोबाईल फोनचे व्यसन

(c) ऑनलाईन शिक्षणाच्या मर्यादा

(d) दहशतवाद : एक आव्हान

**Q2. पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि उताऱ्याच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे सुस्पष्ट, योग्य व संक्षिप्त भाषेत लिहा :** ***12×5=60***

जेव्हा एखादा शेतकरी शेतात कष्ट करत असतो, तेव्हा तो अन्नधान्य आणि उद्योगांसाठी कच्चा माल पुरवत असतो. कापूसही कपडयाच्या कारखान्यांमधून आणि यंत्रमागांमधून कपडयाचे रूप धारण करतो. गाडया सामान एका ठिंकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंत पोहोचवतात. आपल्याला माहीत आहे की, कोणत्याही देशातील एका वर्षात उत्पादित सर्व वस्तू आणि सेवा यांचे एकूण मूल्य यालाच सकल देशांतर्गत उत्पादन असे म्हणतात. आपल्याला निर्यातीमधून मूल्य प्राप्त होत असते आणि आयातीसाठी मूल्य द्यावे लागते. यातून आपण असे पाहतो की, एकूण उत्पन्नात वाढ होऊ शकते किंवा घट होऊ शकते किंवा ते शून्य राहू शकते. आपण प्राप्त झालेल्या सर्व कमाईची बेरीज करतो, तेव्हा ते त्या वर्षासाठीचे सकल देशांतर्गत उत्पादन असते.

सकल देशांतर्गत उत्पादनात भर टाकणाऱ्या सर्व कृतींना आपण आर्थिक कृती म्हणत असतो. अशा सर्व व्यक्ती ज्या आर्थिक कृतींशी संलग्न असतात, त्यांना श्रमिक म्हटले जाते, मग त्या उच्च किंवा निम्न स्तरावर कार्य करणाऱ्या असोत. जरी यांतील काही व्यक्ती आजारी, जखमी इत्यादी शारीरिक त्रासांमुळे, खराब हवामान, सण किंवा सामाजिक धार्मिक उत्सव या कारणांमुळे तात्पुरत्या स्वरूपात कामावर येऊ शकत नाहीत, तरीही त्यांना श्रमिकच म्हटले जाते. या कामांत मुख्य श्रमिकांची मदत करणाऱ्यांनाही आपण श्रमिकच मानतो. सर्वसामान्यपणे आपण असा विचार करतो की, ज्यांना कामाच्या मोबदल्यामध्ये मालकाद्वारे काही मजुरी दिली जाते, अशांना श्रमिक म्हटले जाते. परंतु ते तसे नाही. स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्ती याही श्रमिकच असतात.

भारतात रोजगाराचे स्वरूप एकच एक नाही. काही लोकांना वर्षभर रोजगार उपलब्ध असतो, तर काही लोकांना वर्षातील काही महिनेच रोजगार प्राप्त होत असतो. बहुसंख्य मजुरांना आपल्या कामाचा योग्य मोबदला मिळत नाही. अशा प्रकारच्या श्रमिकांच्या संख्येचा अंदाज लावताना जेवढ्या व्यक्ती आर्थिक कार्यांत संलग्न आहेत, त्या सर्वांना रोजगार प्राप्त असलेल्यांच्या श्रेणीत सामील केले जात आहे. वर्ष 2011-12 मध्ये भारताच्या एकूण श्रमशक्तीचे मूल्य सुमारे 473 दशलक्ष मोजले गेले होते. कारण देशातील बहुतांश लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात, त्यामुळे ग्रामीण श्रमशक्तीचे प्रमाणही शहरी श्रमशक्तीपेक्षा अधिक आहे. या 473 दशलक्ष श्रमिकांमधील तीन चतुर्थांश श्रमिक हे ग्रामीण आहेत.

भारतात श्रमशक्तीमध्ये पुरूषांचे आधिक्य आहे. ग्रामीण क्षेत्रात महिला श्रमिक या एकूण श्रमशक्तीच्या एक तृतीयांश आहेत, तर शहरांमध्ये केवळ 20 टक्के महिलाच श्रमशक्तीत सहभागी आढळल्या गेल्या आहेत. महिला स्वयंपाक करणे, पाणी आणणे, सरपण गोळा करणे, या कामाबरोबरच शेतीतही काम करतात. त्यांना रोख रक्कम किंवा धान्याच्या स्वरूपात मजुरी मिळत नाही. कितीतरी गोष्टींमध्ये तर त्यांना कसलाच मोबदला दिला जात नाही. अर्थतज्ज्ञांचा आग्रह आहे की, या महिलांनाही श्रमिकच मानले गेले पाहिजे.

(a) श्रमिक म्हणजे कोण ? *12*

(b) सकल देशांतर्गत उत्पादन म्हणजे काय ? *12*

(c) भारतात रोजगाराचे स्वरूप कसे आहे ? *12*

(d) कोणत्या महिलांना श्रमिक मानले जात नाही ? *12*

(e) भारतात श्रमिकांच्या लोकसंख्येचे प्रमाण काय आहे ? *12*

**Q3. खालील उताऱ्याचा अंदाजे एक-तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला शीर्षक देऊ नये. सारांश मराठीत लिहा.** ***60***

सभ्यता आणि संस्कृती हे असे दोन शब्द आहेत, जे समजण्यास सर्वाधिक कठीण असतात आणि ज्यांचा सर्वाधिक वापर होत असतो. कल्पना करा त्याकाळाची, ज्या काळात मानवसमाजाचा अग्निदेवतेशी परिचय झाला नव्हता. आज तर घरोघरी चुली आहेत. ज्या व्यक्तीने पहिल्यांदा आगीचा शोध लावला, ती व्यक्ती मोठीच शोधक असली पाहिजे. किंवा कल्पना करा त्या काळाची, ज्या काळात मानवाला सुई-दोऱ्याचा परिचय नव्हता. ज्या माणसाने लोखंडाच्या एका तुकडयाला सुईचे स्वरूप दिले असेल, तो सुद्धा किती मोठा शोधक असला पाहिजे.

या उदाहरणांवर विचार करा; पहिल्या उदाहरणात दोन गोष्टी आहेत : पहिली, एखाद्या विशिष्ट व्यक्तीमध्ये अग्नीचा शोध लावण्याची क्षमता आहे आणि दुसरी, अग्नीचा शोध. याचप्रकारे सुई-दोऱ्याच्या दुसऱ्या उदाहरणात एक गोष्ट आहे सुई-दोऱ्याचा शोध लावण्याची क्षमता आणि दुसरी गोष्ट आहे सुई-दोऱ्याचा शोध. ज्या योग्यता, प्रवृत्ती किंवा प्रेरणा यांच्या बळावर आगीचा व सुई-दोऱ्याचा शोध लागला, ती आहे विशिष्ट व्यक्तीची संस्कृती; आणि त्या संस्कृतीद्वारे जो शोध लागला, जी गोष्ट त्याने आपल्यासाठी, तसेच इतरांसाठी शोधून काढली, तिचे नाव आहे सभ्यता.

एक सुसंस्कृत व्यक्ती कोणत्याही नवीन गोष्टीचा शोध लावते; त्याच्या वंशजांना त्या शोधाचा लाभ आपोआप प्राप्त होतो. ज्या व्यक्तीच्या बुद्धीने किंवा विवेकाने कोणत्याही नवीन तथ्याचे दर्शन घडविले, ती व्यक्ती वास्तविकपणे सुसंस्कृत व्यक्ती असते आणि तिचे वंशज ज्यांना आपल्या पूर्वजांकडून ती वस्तू विनाप्रयास प्राप्त झालेली आहे, ते आपल्या पूर्वजांसारखे भले सभ्य असतील, परंतु त्यांना सुसंस्कृत म्हटले जाऊ शकत नाही. एक आधुनिक उदाहरण घ्या. न्यूटनने गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताचा शोध लावला. तो सुसंस्कृत माणूस होता. आजच्या युगातील भौतिकशास्त्राचा विद्यार्थी न्यूटनच्या गुरुत्वाकर्षण सिद्धांताशी परिचित तर आहे, परंतु त्याचबरोबर त्याला कदाचित न्यूटनला अपरिचित असलेल्या अनेक गोष्टींचे ज्ञान आहे. असे असले, तरी आपण आजच्या भौतिकशास्त्राच्या विद्यार्थ्याला न्यूटनच्या तुलनेते भलेही अधिक सभ्य म्हणू शकू, पण त्याला न्यूटन इतके सुसंस्कृत म्हणू शकत नाही.

अग्नीच्या शोधामागे कदाचित भूक ही एक प्रेरणा आहे. सुई-दोऱ्याच्या शोधामागे कदाचित थंडी व ऊन यांच्यापासून बचाव, तसेच शरीराला सजविणे या प्रवृत्तीचा विशेष हात राहिला आहे. आता, त्या माणसाची कल्पना करा ज्या माणसाचे पोट भरलेले आहे, ज्याचे शरीर वस्त्राने झाकलेले आहे, पण तो जेव्हा खुल्या आकाशाखाली झोपल्यानंतर रात्रीच्या चमचमत्या ताऱ्यांना पाहतो, तेव्हा त्याला केवळ यामुळे झोप येत नाही. कारण तो हे जाणून घेण्यासाठी अस्वस्थ असतो की, आकाशातील मोत्याने भरलेले ताट नेमके कशाचे आहे ? पोट भरण्याची आणि शरीर झाकण्याची इच्छा माणसाच्या संस्कृतीची जननी नाही. पोट भरल्यावर आणि शरीर झाकल्यानंतर सुद्धा जो सुसंस्कृत माणूस असतो, तो शांत बसू शकत नाही. आपल्या सभ्यतेचा एक मोठा भाग आपल्याला अशा सुसंस्कृत व्यक्तींकडून मिळाला आहे ज्यांच्या चेतनेवर मुख्यत: बाह्य भौतिक घटनांचा प्रभाव आहे, परंतु त्यातील काही हिस्सा आपल्याला ज्ञानी व्यक्तींकडूनही मिळलेला आहे ज्यांनी विशिष्ट सत्याला कोणत्याही भौतिक प्रेरणेच्या आहारी जाण्याऐवजी आपल्या आत असलेल्या सहज संस्कृतीच्याद्वारे प्राप्त करून घेतले आहे. रात्रीच्या ताऱ्यांकडे पाहून निद्रेच्या अधीन न गेलेला ज्ञानी मनुष्य आपल्या आजच्या ज्ञानाचा प्रथम पुरस्कर्ता होता.

*(419 शब्द)*

**Q4. पुढील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा :** ***20***

वेळ अनमोल आहे. वस्तुत: वेळ ही जगातील एकमेव अशी गोष्ट आहे जी सीमित आहे. जर आपण संपत्ती गमावली, तर दुसऱ्यांदा ती कमावू शकतो. घर गमावले तर ते दुसऱ्यांदा मिळू शकते. परंतु जर वेळ गमावली, तर ती वेळ आपल्याला दुसऱ्यांदा परत मिळू शकत नाही.

जर आपल्याला जीवनामध्ये काही करून दाखवायचे असेल, काही बनायचे असेल, काही प्राप्त करायचे असेल; तर आपल्याला वेळेचा सर्वश्रेष्ठ उपयोग करून घेणे आवश्यक आहे. जे आपल्याला प्राप्त करून घ्यावयाचे आहे, ते वेळेचा सदुपयोग करून प्राप्त करू शकतो.

"वेळ हीच संपत्ती आहे" असे म्हटले जाते परंतु हे पूर्णत: सत्य नाही. वेळ केवळ संभाव्य धन आहे, हेच सत्य आहे. जर आपण वेळेचा सदुपयोग केला तरच आपण धनसंपत्ती कमावू शकतो. दुसऱ्या बाजूला, जर आपण वेळेचा दुरुपयोग केला तर आपण धनसंपत्ती कमावण्याची संभाव्यता गमावून बसतो. जेव्हा आपण वेळेच्या वापराबाबत सतर्क राहू तेव्हा वेळ वाया घालवणे सोडून देऊ आणि आपल्या वेळेचा सदुपयोग करण्याचे उपाय शोधू लागू. आपण कमी वेळेत जास्त काम करण्याचे उपाय शोधू लागू. जर आपण खऱ्या अर्थाने वेळेचे नियोजन करू इच्छित असू, तर आपल्याला केवळ चेतन मनाचेच नाही तर अवचेतन मनाचाही उपयोग करावा लागेल. हेच आपल्याला असे नवनवे उपाय सुचवेल, ज्याच्यामुळे आपण कमी वेळेत जास्त काम करण्याचे उपाय शोधण्यात सफल होऊ.

**Q5. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. *20***

We cannot deny the importance of games in life as games make a person sound in body and mind. Society expects of a person to fulfil all his duties, for which it is important for him to keep healthy. He may be very intelligent, but his intelligence is of no use if he is not healthy. In some ways, the human body is like a machine. If it is not made use of, it starts to work badly. People who are not fit grow weak; they become more prone to disease. Any form of game is useful, if it gives the body an opportunity to take regular physical exercise. Playing encourages the spirit of sportsmanship. It enables one to deal with life's problems in a wise and natural manner. The important thing in playing is not the winning or the losing, but the participation. We have to remember some other things about playing games. First, it is the physical exercise that is important for health, not the games themselves, and there are other ways of getting this. Is not India the home of yoga ? When we think of the phrase — a healthy mind in a healthy body — we should not forget that it is the mind which is mentioned first. And if we let games become the most important thing in our lives, then we undermine the importance of the mind.

**Q6.** **(a)** **खालील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा.** *2×5=10*

(i) अति तेथे माती *2*

(ii) उचलली जीभ लावली टाळ्याला *2*

(iii) ठकास महाठक *2*

(iv) गंगेत घोडे न्हाणे *2*

(v) साखर पेरणे *2*

**(b)** **खाली दिलेल्या कल्पनांचा 10 वाक्यांत विस्तार करा.** *5×2=10*

(i) मानवता हाच खरा धर्म *5*

(ii) सत्यमेव जयते *5*

**(c)** **खाली दिलेल्या विषयावर 20 वाक्यांचा संवाद लिहा.**

संस्काराचे महत्त्व *10*

**(d)** **खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** *1×5=5*

(i) अतिथी *1*

(ii) खग *1*

(iii) गृह *1*

(iv) युती *1*

(v) हिरमोड *1*

**(e)** **खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** *1×5=5*

(i) दुष्ट *1*

(ii) शीत *1*

(iii) हावरा *1*

(iv) सुवास *1*

(v) नामांकित *1*